मंगळवार दि. २६ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

जिवनदाता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

# कांदा उत्पादकांसाठी सरकारचा मोठा निर्णय

## १ हजार ५८० रुपयानं कांद्याची खरेदी होणार, मात्र शेतकऱ्यांमध्ये नाराजी

**मुंबई -वृत्तसेवा**

कांदा उत्पादक शेतकऱ्यासंदर्भात एक महत्वाची बातमी समोर आली आहे. लासलगाव आंदोलनानंतर केंद्र सरकारकडून रब्बी कांदा २०२६ खरेदीसाठी च-झझ जाहीर केली आहे. २६ मेपासून कांद्याला प्रतिक्विंटल १ हजार ५८० रुपये दर लागू करण्यात येणार आहे.

दरम्यान, सरकारच्या या निर्णयानंतर शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर कायम असल्याचे दिसत आहे. कारण, उत्पादन खर्चाच्या तुलनेत दर अपुरा असल्याची प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली आहे. त्याचबरोबर सरकारने जाहीर केलेल्या दरावर शेतकरी संघटनांच्या नेत्यांनी देखील टीका केली आहे.

२६ मे २०२६ पासून कांद्याला प्रतिक्विंटल १ हजार ५८० रुपये दर लागू राहणार

केंद्राच्या ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या ग्राहक व्यवहार विभागाने नाशिक जिल्ह्यातील रब्बी कांदा २०२६ खरेदीसाठी किमान आश्वासित खरेदी किंमत अर्थात च-झझ जाहीर केली आहे. यानुसार २६ मे २०२६ पासून कांद्याला प्रतिक्विंटल १ हजार ५८० रुपये दर लागू राहणार आहे. मात्र हा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत अपुरा



असल्याची भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होत आहे..कांदा उत्पादनासाठी प्रति किलो २० ते २५ रुपये खर्च येत असून खत, औषधे, मजुरी आणि वाहतूक खर्च सातत्याने वाढत असल्याने उत्पादन खर्चावर आधारित योग्य बाजारभाव निश्चित करावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. दरम्यान, कांद्याला हमीभाव मिळावा यासाठी उद्या ( दिनांक २६ ) चांदवड येथे आमदार रोहित पवार यांच्यासह विविध पक्षांच्या राजकीय पदाधिकारी व कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मोर्चा व रास्ता - रोको आंदोलनाचे आयोजन केले आहे.

कांदा उत्पादनासाठी प्रतिक्विंटल १७०० ते २००० रुपये खर्च येत असताना सरकारने अतिशय कमी मूल्य हे जाहीर केले

केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार व अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या ग्राहक व्यवहार विभागाने नाशिक जिल्ह्यातील रब्बी कांदा खरेदीसाठी किमान आश्वासित खरेदी मूल्य अर्थात च-झझ प्रतिक्विंटल १५८० रु. जाहीर केला आहे. हे फक्त शेतकऱ्यांचा आंदोलन बघता त्यांचा रोष कमी करण्यासाठी सरकारने पाऊल उचलला आहे. खरं तर कांदा उत्पादनासाठी प्रतिक्विंटल १७०० ते २००० रुपये खर्च येत *(पान २ वर)*



जालना शहरात दुपारी ३९ अंश सेल्सिअस तापमान व सहाच्या सुमारास ढगाळ वातावरण झाले व पावसाच्या सरी कोसळल्या त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला. ***छायाचित्र किरण खानापुरे***

# श्री समर्थ रामदास स्वामींच्या पादुकाचे जालन्यात आगमन

## चार दिवस दर्शन व पादुका पूजन सोहळा

**जालना -प्रतिनिधी**

श्री समर्थ रामदास स्वामी मठ, खातगाव, ता. कर्जत येथील श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुकाचे आगमन जालन्यात झाले असून दि. २६ मे पर्यंत मुक्काम आहे. या दिवसात समर्थांच्या पादुकांचे पूजन व दर्शन सोहळा संपन्न होणार आहे. समर्थांच्या पादुकांचा मुक्काम सीमा शेवलीकर देहेडकरवाडी जालना येथे आहे. आनंदी- नारायण कृपाण्यास संचलित श्री समर्थ रामदास स्वामी मठ, खातगाव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर येथील समर्थांच्या पादुकांचे आगमन दि. २२ मे ला जालन्यात झाले. पादुकांचा मुक्काम सीमा शेवलीकर, देहेडकर वाडी यांच्या निवासस्थानी आहे. या चार दिवसात समर्थांच्या पादुकांच्या पूजनाच्या नोंदी झाल्या असून, नोंदलेल्या भक्तांच्या घरोघरी पादुका पूजन व दर्शन कार्यक्रम संपन्न होत आहे. पादुका पूजनास जालन्यातील भक्तांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. सकाळी सहा



वाजता काकडा आरती नंतर पादूकांना अभिषेक होत असतो व नंतर नोंदणी झालेल्या भक्तांच्या घरी पादुका पूजनासाठी जातात. सायंकाळी उपासना नंतर शेजाआरती होत असते. असा नित्याचा कार्यक्रम असून *(पान २ वर)*

# ‘कुपोषणमुक्त जालना’ साठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

## मिशन न्युट्रीशन अंतर्गत जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी यांच्या हस्ते उद्घाटन

**जालना -प्रतिनिधी**

मिशन न्युट्रीशन जालना अंतर्गत जिल्हा स्त्री रुग्णालय, जालना येथे दि. २५ मे ते ७ जून, २०२६ या कालावधीत आयोजित जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन दि. २५ मे रोजी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल



यांनी ‘‘कुपोषणमुक्त जालना’’ हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आरोग्य विभाग, महिला व बाल विकास विभाग तसेच सर्व संबंधित कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करून बालकांचे आरोग्य सुदृढ करण्याच्या उद्देशाने आरोग्य विभाग व *(पान २ वर)*

# परतूर लायन्स क्लब चा पदग्रहण समारंभ महाबळेश्वर दौरा डिझेल टंचाई मुळे रद्द

**परतूर-प्रतिनिधी**

डिझेल टंचाई मुळे लायन्स क्लब परतूरच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला डिझेल टंचाईमुळे निर्णय. सन्माननीय लॉयन राजूजी मुच्छाल पुणे ( इंटरनॅशनल डायरेक्टर इलेक्टेड) यांच्या मार्गदर्शनाखाली लायन्स क्लब परतूर चा पदग्रहण समारंभ महाबळेश्वर येथे १० जून रोजी होणार होता . सर्व कार्यक्रम, प्रमुख अतिथी निवासस्थान, वाहन व्यवस्था नक्की केले होते. आज क्लबच्या सदस्यांनी बैठक घेऊन बदल करून परतुर येथेच पदग्रहण समारंभ होणार आहे. दिवसेंदिवस डिझेलची



टंचाई भासत आहे. शेतीचे काम चालू असून शेतकऱ्यांनाही ट्रॅक्टर साठी डिझेलची गरज आहे. येत्या पंधरा-वीस दिवसात डिझेल टंचाईची परिस्थिती सुधारेलच अशी शक्यता दिसत नाही. या सर्व बाबींचा विचारपूर्वक निर्णय घेऊन क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी १० जून रोजी परतूर येथेच पदग्रहण समारंभ पार पाडण्याचा निर्णय घेतला आहे. एक जुलै पासून लॉयन्स चे नवीन वर्ष सुरू होत असते आणि पुढील वर्षाकरिता लॉयन महेश होलानी अध्यक्ष, लॉयन कैलास तांगडे सचिव, लॉयन नरपत जांगिड कोषाध्यक्ष, या पदाची शपथ घेऊन पुढील वर्षभर कार्य करणार आहेत. लॉयन रेवती राखे झोन चेरपर्सन म्हणून काम करणार आहेत. लॉयन्स क्लब ऑफ परतूर.नवीन पदग्रहण समारंभ परतूर येथे निश्चित करण्यात आला आहे.

# बोव्हाईन ब्रिडींग ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी करा : आयुक्त पशुसंवर्धन यांचे निर्देश

**जालना -प्रतिनिधी**

राज्यातील गाई-म्हशींच्या जातींमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी व प्रजनन प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ‘‘महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३’’ लागू केला असून, या अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश आयुक्त पशुसंवर्धन डॉ. किरण पाटील (भा.प्र.से.) यांनी अधिनस्त अधिकारी वर्गाला दिले आहेत. राज्यात या कायद्याची अंमलबजावणी दि. ५ डिसेंबर, २०२४ पासून सुरू झाली आहे. कृत्रिम रेतन प्रक्रियेद्वारे उत्तम दर्जाच्या व उच्च वंशावळीच्या वळूंचा वापर करून दुधाळ जनावरांची पैदास वाढविणे तसेच प्रजनन प्रक्रियेत होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. या अधिनियमांतर्गत राज्यातील सर्व रेत केंद्रे, भ्रूण प्रत्यारोपण केंद्रे, कृत्रिम रेतन प्रशिक्षण संस्था व सेवा पुरवठादारांना महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. संबंधित संस्थांना केवळ प्रमाणित व उच्च वंशावळीच्या वळूंचेच रेत प्रजननासाठी वापरण्याची परवानगी राहणार आहे. या सर्व प्रक्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी ‘महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण’ स्थापन करण्यात आले असून, प्राधिकरणाला संबंधित केंद्रांची तपासणी, झडती तसेच नियमबाह्य साहित्य जप्त करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. क्षेत्रीय स्तरावर अनेक खाजगी कृत्रिम रेतन सेवा पुरवठादार व संस्था यांनी अद्याप प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली नसल्याचे निदर्शनास आल्याने संबंधितांवर अधिनियमांतर्गत नियमोचित कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई व दंडाची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधितांनी संभाव्य कारवाई टाळण्यासाठी लवकरात लवकर प्राधिकरणाकडे नोंदणी करावी, असे आवाहन आयुक्त पशुसंवर्धन यांनी केले आहे.

**दंड व शिक्षेच्या तरतुदी :**

कलम ४ व ५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्रधारक व्यक्तीने विहित मानकांचे पालन न केल्यास दोष सिद्ध झाल्यावर रु. ५० हजारांपर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्राविना गोजातीय प्रजनन क्रिया करणे अथवा प्रमाणित वळूव्यतिरिक्त इतर वळूंपासून गोठवलेले रेत उत्पादन करणे किंवा अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन केल्यास दोष सिद्ध झाल्यावर रु. १ लाखांपर्यंत दंड आकारण्यात येईल. नोंदणी प्रमाणपत्रानुसार मंजूर सेवांबाबत चुकीची किंवा दिशाभूल *(पान २ वर)*

# बुधवारी जालन्यात शिवसेनेचा शिवसंवाद मेळावा

## संसदरत्न खा.श्रीकांत शिंदे कार्यकर्त्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन करणार

**जालना -प्रतिनिधी**

बुधवार दिनांक २७ मे रोजी संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हे शिवसंवाद दौऱ्यानिमित्त जालना येथे येत आहेत. युवासेना तसेच शिवसेनेच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांसोबत संवाद साधून मार्गदर्शन करणार आहेत. संघटनेच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, असे आवाहन युवासेनेचे सचिव अभिमन्यू (दादा)अर्जुनराव खोतकर यांनी केले आहे. जालना कृषी उत्पन्न समिती कडे जाणाऱ्या रस्त्यावरील हॉटेल द फर्न येथे सकाळी दहा वाजता हा शिवसंवाद मेळावा होणार आहे. जालना भोकरदन आणि बदनापूर विधानसभा मतदार संघातील पदाधिकारी कार्यकर्त्यांसाठी हा मेळावा असणार आहे. या मेळाव्यास शिवसेनेचे जालना जिल्हा संपर्क मंत्री आशिष जयस्वाल, शिवसेनेचे जालना जिल्हा लोकसभा संपर्कप्रमुख माजी मंत्री तथा खासदार संदिपान भुमरे, माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यास शिवसेना युवासेना दलित आघाडी सेना महिला आघाडी शेतकरी सेना अल्पसंख्यांक सेना तथा सर्व सहयोगी संघटनांच्या प्रमुख पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आवर्जून उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच पक्षाचे विद्यमान लोकप्रतिनिधी तथा विद्यमान पदाधिकारी, माजी लोकप्रतिनिधी तथा



माजी पदाधिकारी याशिवाय गटप्रमुख बूथ प्रमुख शिवदूत बीएलए अशा सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे युवा नेते युवासेना सचिव अभिमन्यू अर्जुनराव खोतकर यांनी केले आहे.

शिवसेनेचे युवानेते तथा नुकतेच संसदरत्न पुरस्काराने सन्मानित झालेले खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे हे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्यासोबत प्रत्यक्ष संवाद साधून मार्गदर्शन करणार आहेत.

**शेतकरी व्यापारी उद्योजक यांच्याशीही चर्चा करणार**

डॉ. श्रीकांत शिंदे हे उच्चशिक्षित अभ्यासू नेते आहेत. जालना शहर आणि ग्रामीण भागातील प्रश्नही ते जाणून घेणार आहेत. यासाठी शेतकरी, व्यापारी,उद्योजक, डॉक्टर्स, वकील, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांसोबत मेळावा सुरू होण्यापूर्वी प्रत्यक्ष भेटीत चर्चा करणार आहेत. तेव्हा या प्रतिष्ठित वर्गानेही आवर्जून उपस्थित रहावे, अशी विनंती देखील अभिमन्यू खोतकर यांनी केली आहे.

# संपादकीय...

## नावीन्यपूर्णतेच्या युगाचा करा स्वीकार

गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, मेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारीकपातीच्या बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. या परिवर्तनात अनेक नव्या संधी दडल्या आहेत.

आजच्या काळात जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञान, शिक्षण, करिअरच्या संधी आणि जीवनशैली या सर्व गोष्टींमध्ये मोठे परिवर्तन होत आहे. जग अशा एका टप्प्यावर उभे आहे, जिथे तंत्रज्ञान अभूतपूर्व वेगाने बदलत आहे. जागतिक माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा चेहरा-मोहरा पूर्णपणे बदलून गेला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, मेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारी कपातीच्या (ले-ऑफ) बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. एखादी मोठी कंपनी कर्मचारी कपात करते, तेव्हा सामान्यतः मंदीची भीती व्यक्त केली जाते. पण सध्याचे ले-ऑफ हे मंदीपेक्षा 'बदलत्या प्राधान्यक्रमामुळे' अधिक आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन (स्वयंचलन) आणि क्लाउड कॉम्प्युटिंग यांसारख्या तंत्रज्ञानांमुळे कामाचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी दहा लोकांची गरज असणारी कामे आता प्रगत सॉफ्टवेअरच्या मदतीने कमी वेळेत आणि अचूकपणे होऊ लागली आहेत. याचा अर्थ असा की, पारंपरिक कौशल्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची गरज कमी होत असून नवीन तंत्रज्ञान अवगत असलेल्या लोकांची मागणी वाढत आहे.

भारतीय आयटी क्षेत्र हे जगाचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात अनुभवायला मिळत असलेल्या ताज्या बदलांमुळे भारतीय आयटी उद्योग आकुंचन पावेल, अशी अनेकांना भीती वाटते; परंतु वास्तव याच्या उलट आहे. भारतीय आयटी क्षेत्र कमी होत नसून संक्रमित होत आहे. सायबर सिक्युरिटी, डेटा नालिटिक्स, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रांसाठी केवळ पदवी पुरेशी नसून विशिष्ट कौशल्ये, विश्लेषणात्मक विचार आणि सतत शिकण्याची तयारी असणे आवश्यक आहे. स्वतःला या बदलांनुसार जुळवून घेणाऱ्या व्यावसायिकांसाठी भविष्यात संधींचे आकाश खुले आहे. त्यानुसार त्यांना परिस्थितीची जाणीव व्हायला हवी. भारतातील पुणे, बंगळूरू आणि हैदराबादसारखी शहरे आता जागतिक स्तरावर 'इनोव्हेशन हब' म्हणून नावारूपाला येत आहेत. विशेषतः पुण्यात 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स' (जीसीसी) मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पूर्वी ही केंद्रे केवळ बॅक-ऑफिस कामांसाठी वापरली जात होती, पण आता ती जागतिक कंपन्यांची धोरणात्मक संशोधन आणि विकास केंद्रे बनली आहेत. याचा अर्थ असा की, भारतीय प्रतिभा आता मायदेशात राहूनच जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञानावर काम करत आहेत. ही केंद्रे केवळ सेवा देणारी नसून जागतिक स्तरावर नावीन्यपूर्ण शोध लावणारी केंद्रे बनली आहेत. या बदलाच्या काळात आयटी विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी असलेला एक महत्त्वाचा संदेश म्हणजे अनुकूलता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. पूर्वी एकदा पदवी घेतली की, आयुष्यभर त्या जोरावर नोकरी करता येत असे, पण आता ती परिस्थिती राहिलेली नाही. तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, दर दोन-तीन वर्षांनी तुम्हाला नवीन काही तरी शिकावेच लागेल. सतत शिकणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि तांत्रिक प्रगतीशी अपडेट राहणे, हे आता करिअरमधील यशाचे मूलभूत मंत्र बनले आहेत. ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, इंडस्ट्री सर्टिफिकेशन आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवरील कामाचा अनुभव आता नोकरीच्या बाजारपेठेत तुमची किंमत ठरवत आहेत. ती ओळखून आपल्या कौशल्यांमध्ये बदल करत राहणे गरजेचे आहे, हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या नव्या पिढीला कळणे आवश्यक आहे. यापुढील काळात फक्त विद्यार्थ्यांनीच बदलून चालणार नाही, तर आपल्या शैक्षणिक संस्थांनाही काळानुसार बदलावे लागेल. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ आणि शैक्षणिक संस्था यांनी एकत्र येऊन 'कौशल्य दरी' भरून काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करणारे अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. कल्पकता वाढवणे, उद्योजकता जोपासणे आणि डिजिटल साक्षरतेमध्ये गुंतवणूक करणे यामुळेच भारताची जागतिक स्पर्धात्मकता टिकून राहील. प्रत्येक क्षेत्रात वेगाने वाढत असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता नोकऱ्या हिरावून घेईल, अशी भीती अनेकांना वाटते. पण इतिहास साक्षी आहे की, जेव्हा जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले, तेव्हा सुरुवातीला काही नोकऱ्या गेल्या; पण त्यापेक्षा कैक पटींनी नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. संगणक आले तेव्हाही अशीच भीती होती, पण संगणकामुळे आज आयटी क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. एआय हे मानवाचे रिप्लेसमेंट नसून मानवाची क्षमता वाढवणारे एक साधन आहे. एआयचा प्रभावी वापर करायला शिकलेले तेच भविष्यातील कामाच्या ठिकाणी सर्वात मौल्यवान असतील. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार, हे निश्चित आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. नवी संशोधन केंद्रे, नवउद्योग आणि शैक्षणिक संस्था या विषयावर भर देत आहेत. त्यांना अपेक्षित मनुष्यबळ आणि अस्तित्वात असणाऱ्या कार्यपद्धतीतील बदल लक्षात घेऊन आपल्या कामात बदल करणारे काळाची कसोटी पार करतील, तसेच बदलणाऱ्या अपेक्षांची पूर्तताही करतील. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे. नव्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जिज्ञासू वृत्ती. नेहमी प्रश्न विचारा आणि नवीन गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक राहा. या युगात तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेतच, पण त्याचबरोबर 'सॉफ्ट स्किल्स' ही तेवढीच महत्त्वाची आहेत. संवादकौशल्य, नेतृत्व आणि सांघिक कार्य या बाबी मशीन करू शकत नाहीत.

# लोकांतील, लोकांचा लोकनेता; विलासराव देशमुख

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची आज ८१ वी जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २६ मे १९४५ रोजी लातूरमधील बाभळगावमध्ये त्यांचा जन्म झाला. विलासरावांनी पुण्यात बीएससी, बीए, एलएलबी यासारखे उच्च शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यावर विलासराव आपल्या गावी बाभळगावला परतले. १९७४ साली विलासराव बाभळगाव चे सरपंच झाले. १९७५ पासून ते काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते बनले. १९८० साली त्यांनी पहिल्यांदा लातूर विधानसभा मतदार संघातून आमदारकीची निवडणूक लढवली आणि पहिल्याच प्रयत्नात ते आमदार म्हणून ते निवडून आले. १९८२ साली त्यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून निवड झाली. त्यांनी कृषी, ग्रामविकास, सहकार, शिक्षण, तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. १९८६ साली ते महसूल आणि सहकार या महत्वाच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री बनले. उद्योग आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामामुळेच ते सलग तीनदा विधानसभेत निवडून गेले मात्र १९९५ सालची विधानसभा निवडणूक त्यांना जिंकता आली नाही. १९९२- ९३ साली झालेल्या दंगली आणि बॉम्बस्फोट, काँग्रेसमधील सुंदोपसुंदी, तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर झालेले आरोप, एनरॉन प्रकरण यामुळे काँग्रेसचा पराभव झाला. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यात विलासरावांचाही समावेश होता. विलासराव देशमुख यांना जनता दलाच्या शिवाजी कव्हेकर यांनी पराभूत केले. आपल्या गडात झालेला पराभव विलासरावांना खूप लागला. विलासराव देशमुख पडावेत यासाठी तेंव्हा काँग्रेसमध्ये असलेल्या बड्या नेत्याने प्रयत्न केल्याचे तेंव्हा बोलले जात होते. १९९५ साली राज्यात भाजप शिवसेना युतीचे सरकार आले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते विधिमंडळात नाही याची विलासरावांना खंत वाटत होती त्यामुळे काहीही करून विधिमंडळात जायचे असा चंग त्यांनी बांधला. पुढच्याच वर्षी म्हणजे १९९६ साली विधानपरिषद निवडणूक लागली मात्र काँग्रेसच्या हायकमांडने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे बंडखोरी करून विधान परिषदेसाठी उभे रहा असा आग्रह त्यांना त्यांच्या समर्थकांनी केला. काँग्रेसच्याही अनेक नेत्यांनी त्यांना तसा सल्ला दिला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तर त्यांना थेट शिवसेनेत येण्याची ऑफर दिली मात्र सारं आयुष्य काँग्रेस संस्कृतीत गेल्याने शिवसेनेत जाणं विलासरावांना शक्य नव्हतं म्हणून ते या निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत शिवसेनेने त्यांना मदत केली तरीही त्यांचा अवघ्या अर्ध्या मतांनी पराभव झाला. विधान परिषद निवडणुकीत प्रत्येक मताला ठराविक मूल्य असतं आणि मत मोजण्याची पद्धतही वेगळी असते. सलग दोन वर्षात दोन पराभव झाल्याने विलासरावांचे राजकारण संपले, विलासराव आता पुन्हा निवडून येऊ शकत नाही अशी टीका त्यांच्यावर होऊ लागली मात्र हार मानतील ते विलासराव कसले ? विलासरावांनी पुन्हा नव्याने सुरुवात केली. जनतेत गेले, जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडले त्याचे परिणाम लवकरच दिसले. १९९९ साली शरद पवार काँग्रेस मधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली.

त्याच वर्षी म्हणजे १९९९ साली विधानसभेच्या निवडणुका लागल्या. या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांच्या विरोधात लढले तर शिवसेना भाजपने युतीत एकत्र निवडणुका लढवल्या. एकत्र लढूनही भाजप सेना युतीला बहुमत मिळाले नाही त्या दोन्ही पक्षांना मिळून १२५ जागा मिळाल्या तर स्वतंत्र लढलेल्या काँग्रेसला ७५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ५८ जागा मिळाल्या. निकाला नंतर काँग्रेस राष्ट्रवादी यांच्यात सरकार स्थापने साठी बोलणी सुरू झाली. छोट्या मोठ्या पक्षांनी देखील काँग्रेस आघाडीला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. सर्वाधिक जागा काँग्रेसच्या निवडून आल्याने काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले. काँग्रेस कडून लातूर मतदार संघातून विलासराव देशमुख सर्वाधिक मते घेऊन जिंकून आले होते. ज्या मतदार संघात त्यांचा पराभव झाला होता त्याच मतदार संघात ते पुन्हा विक्रमी मतांनी निवडून आले होते त्यामुळे मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत ते सर्वात पुढे होते शिवाय अपक्ष म्हणून जिंकून आलेल्या आमदारांनीही विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री असावेत अशी अट ठेवल्याने काँग्रेस हायकमांडने त्यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड केली. जिंकून आलेल्या सर्व आमदारांनी विलासरावांना एकमुखी पाठिंबा दिला आणि ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले. सलग दोन पराभव स्वीकारून ही थेट मुख्यमंत्रीपद मिळाल्याने विलासरावांची पराभवाची सल दूर झाली. काँगेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी अतिशय चांगले काम केले पण २००३ साली त्यांना राजीनामा द्यावा लागला मात्र अवघ्या वर्षभरात म्हणजे २००४ साली त्यांची मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली २००४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या काँग्रेसच्या सर्व आमदारांनी विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री हवेत अशी मागणी केल्याने त्यांचीच पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. २००४ साली विलासराव दुसऱ्यांना मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री पदाच्या दुसऱ्या कार्यकाळातही त्यांनी चांगले काम केले मात्र २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला आणि त्यांचे मुख्यमंत्रीपद गेले मात्र अल्पावधीतच त्यांची केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. १४ ऑगस्ट २०१२ रोजी विलासरावांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. त्यांचे आकस्मिक निधून महाराष्ट्रातील जनतेला धक्का देऊन गेले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. विलासराव देशमुखांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### आर्डा-तोलाजी परिसरात वीज कोसळून शेतकऱ्याचा मृत्यू; पंचनाम्यांचे आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रशासनाला निर्देश

# केळी बागा उद्ध्वस्त, घरे व सोलर प्रकल्पांचे नुकसान

परतूर -प्रतिनिधी

दि. २५ मे जालना जिल्ह्यात सोमवारी सायंकाळी अनेक भागांत झालेल्या अवकाळी पावसाने व वादळी वाऱ्यांनी मोठे नुकसान घडवून आणले. विशेषतः परतूर तालुक्यात मुसळधार पावसासह चक्रीवादळसदृश वाऱ्यांनी थैमान घातल्याने शेतकरी वर्गाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. केळी बागा जमीनदोस्त झाल्या असून अनेक ठिकाणी घरांची पत्रे उडाली, तर शेतकऱ्यांचे सौरऊर्जा प्रकल्पही उद्ध्वस्त झाल्याची माहिती समोर आली आहे.



तालुक्यातील सालगाव येथे वादळी वाऱ्यामुळे केळीच्या बागांचे संपूर्ण नुकसान झाले. शेतकऱ्यांनी मोठ्या खर्चाने उभारलेल्या केळी पिकांवर नैसर्गिक आपत्तीने अक्षरशः पाणी फेरले आहे. अनेक एकरांवरील केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. उत्पादनाच्या आशेवर घेतलेले कर्ज आणि वाढलेला उत्पादन खर्च यामुळे आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांवर या नुकसानीमुळे आणखी मोठे संकट ओढवले आहे.

दरम्यान, मापेगाव परिसरात चक्रीवादळासारख्या प्रचंड वेगवान वाऱ्यांमुळे मोठ्या प्रमाणात हानी झाली. अनेक घरांवरील टिनपत्रे व छप्परे उडून गेली असून काही ठिकाणी झाडे कोसळल्याच्या घटनाही घडल्या आहेत. शेतकऱ्यांनी शेतांमध्ये उभारलेले सोलर पंप व सौरऊर्जा प्रकल्पांचे साहित्य देखील वाऱ्यामुळे उडून गेल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक गावांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला होता.

याचदरम्यान अर्डा-तोलाजी परिसरातून एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. वादळी पावसादरम्यान वीज कोसळून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पुढे येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून प्रशासनाकडून अधिकृत माहितीची प्रतीक्षा आहे.

या नैसर्गिक आपत्तीची गंभीर दखल घेत आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. परतूर तहसीलदार, मंठा तहसीलदार, उपविभागीय अधिकारी (एसडीएम), तालुका कृषी अधिकारी तसेच कृषी विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांना त्वरित नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

आमदार लोणीकर यांनी सांगितले की, शेतकरी आधीच दुष्काळ, उत्पादन खर्च आणि बाजारभावाच्या समस्यांशी झुंज देत आहेत. अशा परिस्थितीत झालेल्या या अवकाळी पावसामुळे आणि वादळामुळे झालेल्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाकडून तातडीची मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले. पावसामुळे पिकांचे, फळबागांचे, घरांचे तसेच शेतीपूरक साधनसामग्रीचे नुकसान झाल्याने शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिक प्रशासनाकडून तातडीच्या मदतीची अपेक्षा व्यक्त करीत आहेत. महसूल व कृषी विभागाच्या पथकांकडून पुढील काही दिवसांत प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीचा अहवाल तयार केला जाणार असून त्यानंतर शासनाकडे मदतीचा प्रस्ताव पाठविला जाणार आहे.

अवकाळी पावसाच्या या तडाख्यामुळे परतूर तालुक्यातील अनेक गावांमध्ये चिंता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

# पान १ वरुन...

### कांदा उत्पादकांसाठी...

असताना सरकारने अतिशय कमी मूल्य हे जाहीर केले आहे. हे मूल्य जाहीर करत असताना राज्यात अनेक जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकरी असताना फक्त हे नाशिक जिल्ह्यासाठीच का..? असा सवाल ही रविकांत तुपकर यांनी सरकारला विचारला आहे. कांद्यावर निर्यात शुल्क न लावता कांदा निर्यात केला पाहिजे तरच कांदा उत्पादक शेतकरी जगेल असेही रविकांत तुपकर यांनी म्हटले आहे.

### श्री समर्थ रामदास...

ज्यांना स्वतःच्या हस्ते स्वतःच्या घरी पादुका पूजनाचा लाभ घ्यायचा त्यांनी आपल्या नोंदणीसाठी सीमा शेलगावकर यांचेकडे संपर्क साधावा.

समर्थ मठाचे अध्यात्मिक अधिष्ठान आबादित ठेवून अध्यात्मिक साधनेबरोबर सामाजिक उपक्रमावरही मठाचा तितकाच भर असतो. या मठात गो पालन, वैदिक शाळा, आरोग्य तपासणी असे विविध उपक्रम राबवले जातात. तसेच या मठात दासनवमी, रामनवमी, हनुमानजन्मोत्सव आणि गुरुपौर्णिमा हे कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. या उत्सवात मोठ्या प्रमाणावर अन्नदान होत असते. समर्थांचे पादुका पूजन, दर्शन व भिक्षेत मिळालेल्या देणगीतून या मठाचे उपक्रम होत असतात. म्हणून या उपक्रमास आपलाही सहभाग लाभावा. यासाठी भक्तांनी पादुका पुजनाची नोंदणी करावी असे मठाच्या विश्वस्तांनी आवाहन केले आहे.

### 'कुपोषणमुक्त जालना...

महिला व बाल विकास विभागाच्या संयुक्त विद्यमाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी, गटप्रवर्तक, आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविका यांना पोषण आहार, संतुलित आहार, माता व बालकांच्या आरोग्याची काळजी तसेच कुपोषण प्रतिबंध याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे. प्रशिक्षणासाठी आयआयटी मुंबई यांच्या माध्यमातून पोषण आहारासंदर्भातील शैक्षणिक व्हिडिओंचा उपयोग करण्यात येत असून व्हील ग्लोबल फाऊंडेशन यांच्या सहकार्याने प्रशिक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत सुमारे २५० प्रशिक्षणार्थींना विशेष प्रशिक्षण दिले जाणार असून प्रशिक्षणानंतर प्रत्येक प्रशिक्षणार्थीने १:३ या प्रमाणात मातां व बालकांना दत्तक घेऊन त्यांचे समुपदेशन करायचे आहे. यामध्ये पोषण आहाराचे महत्त्व, संतुलित आहार बालकांच्या वाढीचे निरीक्षण आणि कुपोषण टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली जाणार आहे. तीन महिन्यांच्या कालावधीत सुमारे २ हजार २५० माता व बालकांपर्यंत या मोहिमेचा लाभ पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रम जिल्ह्यातील कुपोषण निर्मूलनासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्णकांत कनवारिया, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जयश्री भुसारे, डॉ. प्राची तापशेटीवार, डॉ. जी. डी. म्हस्के, महिला व बाल विकास विभागाच्या श्रीमती कोरे, जिल्हा प्रकल्प समन्वयक संदीप गुसाळे, साक्षी उगले तसेच आरोग्य विभाग व एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बोव्हाईन ब्रिडींग...

करणारी जाहिरात अथवा प्रसिद्धी केल्यास दोष सिद्ध झाल्यावर सहा महिन्यांपर्यंत साधा कारावास किंवा रु. २ लाखांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना :**

फक्त प्रमाणित व अधिकृत विर्यामात्रांचाच वापर करावा. सेवा घेण्यापूर्वी तंत्रज्ञाचा नोंदणी क्रमांक तपासून नोंदणीकृत तंत्रज्ञांकडूनच सेवा घ्यावी. कोणतीही अनियमितता आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवून पशुधनाचे संरक्षण करावे.

**शेतकऱ्यांना होणारे फायदे :**

सुधारित व उच्च उत्पादनक्षम वंशामुळे अधिक दूध उत्पादन मिळणार आहे. उत्तम प्रजनन कार्यक्षमतेमुळे जनावरांची संख्या व गुणवत्ता वाढणार आहे. वैज्ञानिक व नियंत्रित प्रजननामुळे दीर्घकालीन पशुधन विकास साध्य होणार आहे. दुग्ध व्यवसायात स्थैर्य निर्माण होऊन आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे.

# प्लास्टिक मुक्ती: ही तर काळाची गरज

एकविसाव्या शतकात मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रचंड प्रगती केली आहे. या प्रगतीच्या प्रवासात मानवाने स्वतःच्या सुखासाठी अनेक शोध लावले, त्यापैकीच एक अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांती घडवून आणणारा शोध म्हणजे प्लास्टिक. हलके वजन, टिकाऊपणा, स्वस्त किंमत आणि हवा तसा आकार देण्याची क्षमता यामुळे प्लास्टिकने अल्पावधीतच मानवी जीवनावर पूर्ण ताबा मिळवला.

आज आपण सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत वापरत असलेल्या वस्तूंची यादी केली, तर त्यात ८० टक्क्यांहून अधिक वस्तू प्लास्टिकच्या आढळतील. टूथब्रश, दुधाची पिशवी, पाण्याचे पाऊच, दुकानातील कॅरीबॅग, विमानाचे सुटे भाग या सर्व गोष्टींमध्ये प्लास्टिक आहे. परंतु, ज्या प्लास्टिकने आपले जीवन सोपे आणि गतिमान केले, तेच प्लास्टिक आज संपूर्ण जगासाठी, मानवी आरोग्यासाठी आणि निसर्गासाठी एक महाभयंकर शाप ठरले आहे. म्हणूनच, प्लास्टिक मुक्ती हा आता केवळ एक पर्यावरणाचा विषय राहिलेला नसून, तो पृथ्वीच्या आणि मानवाच्या अस्तित्वाचा प्रश्न बनला आहे.

२५ मे हा जागतिक प्लास्टिक मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो प्लास्टिकचा मोठ्या प्रमाणावर वापर व त्यापासून होणारी आणि पर्यावरणाचा ऱ्हास या गोष्टीला आळा घालण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो जेणेकरून प्लास्टिक वापर कमी होण्याविषयी प्रबोधन होईल व काहीतरी साध्य होईल हाच त्यामागचा हेतू आहे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीला प्लास्टिकचा शोध लागला. सुरुवातीला हा निसर्गाला वाचवणारा शोध मानला गेला, कारण यामुळे हस्तिदंत, कासव किंवा लाकूड यांसारख्या नैसर्गिक संसाधनांचा वापर कमी झाला. परंतु, प्लास्टिकच्या अविनाशी असण्याच्या गुणधर्मामुळेच आज जगासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. प्लास्टिक हे पेट्रोकेमिकल्सपासून बनवले जाते. याचे नैसर्गिक पद्धतीने विघटन () होत नाही. आपण वापरून फेकून दिलेली एक साधी प्लास्टिकची पिशवी किंवा पाण्याची बाटली जमिनीत पूर्णपणे विरघळण्यासाठी काही वर्षांचा काळ लागतो. याचा अर्थ असा की, आजपर्यंत पृथ्वीवर जेवढे प्लास्टिक तयार झाले आहे, त्याचा एकही कण पूर्णपणे नष्ट झालेला नाही; तो कोणत्या ना कोणत्या रूपात आजही पृथ्वीवर अस्तित्वात आहे.

याचे पर्यावरण आणि सजीवांवर घातक परिणाम होत असतात.

प्लास्टिकचा कचरा,जुनी इलेक्ट्रिक उपकरणे फेकून दिली जातात,ते नष्ट होत नसतात,प्लास्टिक पिशव्या वापराबंदी येऊनही सर्रास वापर सुरू आहे.आपल्याला तर ते घातक आहे,तसा जनावरांनाही,तो खाऊनही हज्जारो जनावरे मृत्यमुखी पडतात.पशुधन नष्ट होते.रस्त्याच्या दुतर्फा पडलेले कचऱ्याचे ढीग आपण पहातोच.निसर्गातील अर्थातच वातावरणातील बदलाचा पर्यावरणाचा समतोल ढासळण्यावर मोठा परिणाम होतो.




प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावणे हे जगासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. दरवर्षी जगभरात कोट्यवधी टन प्लास्टिक कचरा निर्माण होतो. या समस्येचे परिणाम अत्यंत भयानक आहेत:

१. जलचरांचे मरण: आज जगातील सर्व नद्या, नाले आणि महासागर प्लास्टिक कचऱ्याचे डंपिंग यार्ड बनले आहेत. महासागरांमध्ये प्लास्टिकचे प्रचंड डोंगर तरंगत असतात.. समुद्रातील मासे, कासव, व्हेल आणि इतर जलचर प्राणी या प्लास्टिकला आपले अन्न समजून गिळतात. यामुळे दरवर्षी लाखो समुद्री जीवांचा गुदमरून मृत्यू होतो.

२. मातीचा पोत बिघडणे: शेतात आणि जमिनीत प्लास्टिक गाडले गेल्यामुळे पाऊस पडल्यावर पाणी जमिनीत मुरत नाही. यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खालावत चालली आहे. तसेच मातीची सुपीकता नष्ट होऊन शेती उत्पादनावर याचा थेट परिणाम होत आहे.

३. हवेचे प्रदूषण: अनेक ठिकाणी कचरा कमी करण्यासाठी प्लास्टिक उघड्यावर जाळले जाते. प्लास्टिक जाळल्यामुळे हवेत कार्बन मोनॉक्साइड आणि डायोक्सीन यांसारखे अत्यंत विषारी वायू सोडले जातात. हा धूर श्वासाद्वारे शरीरात गेल्याने श्वसनाचे आजार आणि दमा वाढतो.

४. मायक्रोप्लास्टिकचा धोका: ऊन, वारा आणि पाऊस यांच्या माऱ्यामुळे प्लास्टिकचे बारीक बारीक तुकडे होतात. या ५ मिलिमीटरपेक्षा लहान कणांना मायक्रोप्लास्टिक म्हणतात. हे मायक्रोप्लास्टिक आज समुद्रातील माशांच्या पोटात, आपण पीत असलेल्या पाण्यात आणि थेट मानवी शरीरात पोहोचले आहे, जी अत्यंत चिंताजनक बाब आहे.

महाराष्ट्रातील प्लास्टिक बंदी आणि सद्यस्थिती

भारतातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असल्याने महाराष्ट्रात प्लास्टिकचा वापर आणि त्यामुळे निर्माण होणारी कचऱ्याची समस्या अत्यंत गंभीर आहे . राज्याने २०१८ मध्येच प्लास्टिक आणि थर्माकोलवर ऐतिहासिक बंदी जाहीर केली होती, ज्याची व्याप्ती वेळोवेळी वाढवण्यात आली आहे.

सध्याच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात वर्षाला सुमारे चार लाख टन प्लास्टिक कचरा तयार होतो. यापैकी सुमारे साडेतीन लाख टन कचरा गोळा केला जातो, तर ६६,000 टनांपेक्षा जास्त कचरा दरवर्षी गोळा न होता थेट जमीन, नद्या किंवा समुद्रात जातो. यामध्ये सर्वाधिक वाटा मुंबई आणि पुणे यांसारख्या मोठ्या शहरांचा आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या () अहवालानुसार, महाराष्ट्राला लाभलेल्या ७२० किमीच्या किनारपट्टीवरील कचऱ्यामध्ये तब्बल ८१% कचरा केवळ प्लास्टिकचा आहे . सध्या राज्यात सिंगल-यूज प्लास्टिकवर पूर्ण बंदी असून, केवळ १२० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीच्या आणि पुनर्वापर करता येणाऱ्या पिशव्यांनाच परवानगी आहे. नियम तोडणाऱ्यांवर पहिल्यांदा ५,000 रुपये, दुसऱ्यांदा १०,000 रुपये आणि तिसऱ्यांदा थेट २५,000 रुपये दंड व ३ महिन्यांच्या कारावासाची कडक तरतूद करण्यात आली आहे. मात्र, पर्याय महाग असल्यामुळे आजही छुप्या पद्धतीने प्लास्टिकचा वापर सुरूच आहे, जे प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे.

प्लास्टिक मुक्तीसाठी त्रिसूत्री--

प्लास्टिक मुक्तीची चळवळ यशस्वी करण्यासाठी आपल्याला कमी वापर (), पुन्हा वापर () आणि पुनर्वापर () या त्रिसूत्रीचा अंगीकार करावा लागेल.

कमी वापर (): प्लास्टिक मुक्तीची पहिली पायरी म्हणजे त्याचा वापर शक्य तितका कमी करणे. विशेषतः स्ट्रॉ, प्लास्टिकचे चमचे, ग्लास, पाण्याच्या बाटल्या यावर आपण स्वतःहून बंदी घातली पाहिजे. बाजारात जाताना घरातूनच कापडी किंवा ज्यूटची पिशवी सोबत नेण्याची सवय लावली पाहिजे.

पुन्हा वापर (): घरात आलेल्या प्लास्टिकच्या वस्तू किंवा डबे लगेच फेकून न देता त्यांचा वारंवार वापर केला पाहिजे. जुन्या पाण्याच्या बाटल्यांचा वापर घरात शोभेची रोपे लावण्यासाठी करता येऊ शकतो.

पुनर्वापर (): घरातील ओला कचरा आणि सुका कचरा नेहमी वेगळा ठेवावा. प्लास्टिकचा सुका कचरा कचराकुंडीत न टाकता तो थेट रिसायकलिंग करणाऱ्या यंत्रणेला किंवा भंगारवाल्याला दिला पाहिजे.



पर्यावरणपूरक पर्याय आणि संशोधन

प्लास्टिकवर पूर्णपणे बंदी घालायची असेल, तर सामान्य जनतेला स्वस्त आणि पर्यावरणपूरक पर्याय देणे गरजेचे आहे. आज विज्ञानाने यावर काही मार्ग शोधले आहेत.

कापडी आणि कागदी पिशव्या हा प्लास्टिक कॅरीबॅगला सर्वात सोपा आणि पारंपरिक पर्याय आहे. तो पर्याय महाग असल्यामुळे त्याला विरोध होतो.

बायो-प्लास्टिक ( ): कॉर्न स्टार्च, बटाट्याचे साले किंवा तांदळाच्या कोंड्यापासून बनवलेले प्लास्टिक, जे काही दिवसांत जमिनीत नैसर्गिकरीत्या कुजते.

बांबू आणि लाकडाच्या वस्तू: प्लास्टिकच्या चमचे आणि टूथब्रश ऐवजी बांबूपासून बनवलेल्या वस्तूंचा वापर वाढवला पाहिजे.

रस्ते निर्मिती: सध्या महाराष्ट्रातही गोळा झालेल्या प्लास्टिक कचऱ्याचा वापर डांबरासोबत करून मजबूत रस्ते बनवले जात आहेत, या तंत्रज्ञानाचा वापर वाढवला पाहिजे.

यासोबतच, विस्तारित उत्पादक जबाबदारी हा नियम कडक केला पाहिजे. याचा अर्थ ज्या कंपन्या प्लास्टिक पॅकेजिंगमध्ये आपले उत्पादन विकतात, त्यांनीच तो प्लास्टिक कचरा बाजारातून गोळा करून रिसायकल करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे.

निसर्गाने आपल्याला राहण्यासाठी एक सुंदर आणि स्वच्छ पृथ्वी दिली आहे. हवा, पाणी आणि जमीन या निसर्गाच्या मौल्यवान देणग्या आहेत. आपल्या तात्पुरत्या सुखासाठी आणि आळसामुळे या वसुंधरेला प्लास्टिकच्या विळख्यात ढकलणे हा निसर्गाचा मोठा अपमान आहे. प्लास्टिक मुक्त भारत किंवा प्लास्टिक मुक्त महाराष्ट्र हे स्वप्न पूर्ण करणे अशक्य नाही. गरज आहे ती फक्त एका दृढ संकल्पाची. ''मी आजपासून प्लास्टिकचा वापर थांबवेन,'' ही प्रत्येक व्यक्तीची छोटी प्रतिज्ञा उद्याच्या मोठ्या बदलाची सुरुवात ठरेल. चला तर मग, आपल्या पुढच्या पिढीला एक सुंदर, हिरवीगार आणि स्वच्छ पृथ्वी भेट देण्यासाठी आजच प्लास्टिकचा त्याग करूया आणि पर्यावरण रक्षणाचे कार्याला सुरुवात करूया !

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**८९९९५६६९१७**

# जामीन अर्जाचा प्रकार नव्हे, तर कारण महत्त्वाचे: मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

**मुंबई - वृत्तसेवा**

उच्च न्यायालयाने एका अत्यंत महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे की, जामिनासाठी आवश्यक आणि सबळ कारणे अर्जात नमूद केली असल्यास, नियमित जामिनासाठी केलेला अर्जदेखील वैधानिक जामिनासाठी ग्राह्य धरला जाऊ शकतो. न्यायमूर्ती एम. एम. नेरळीकर यांनी अधोरेखित केले की, जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा प्रश्न येतो, तेव्हा अर्जाच्या स्वरूपातील तांत्रिक बाबींमुळे जामीन मिळवण्याचा त्याचा कायदेशीर हक्क नाकारता येणार नाही. या महत्त्वपूर्ण निकालाचे स्वागत करताना, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी म्हटले आहे की, ''हा निकाल म्हणजे न्यायप्रणालीने कायद्याच्या तांत्रिकतेपेक्षा व्यक्ती स्वातंत्र्याच्या तत्त्वाला दिलेले सर्वोच्च प्राधान्य आहे. यामुळे केवळ तांत्रिक चुकांमुळे तुरुंगात असलेल्या अनेक कच्च्या कैद्यांना मोठा दिलासा मिळेल. सदर प्रकरण आशिष प्रकाश वाळके विरुद्ध महाराष्ट्र राज्य यांच्यातील असून, ते फौजदारी अर्ज (जामीन) क्रमांक ३७६/२०२६ म्हणून न्यायालयात सुनावणीसाठी आले होते. अर्जदाराला एका वाहनातून मेफेड्रोन जप्त केल्याप्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), २२(क) आणि २९ अंतर्गत अटक करण्यात आली होती. रासायनिक विश्लेषण अहवालाशिवाय आरोपपत्र दाखल झाल्याने तपास अपूर्ण असल्याचा युक्तिवाद करत अर्जदाराने जामिनाची मागणी केली होती. राज्य सरकारने या अर्जाला विरोध करत म्हटले की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३९ (नवीन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८३) अंतर्गत दाखल केलेला अर्ज वैधानिक जामिनासाठी (कलम १६७(२)/ कलम १८७(३) ग्राह्य धरता येणार नाही. या प्रकरणात न्यायालयाने वैधानिक जामीन म्हणजे काय, हे सविस्तरपणे स्पष्ट केले. कायद्यानुसार, अटक केल्यानंतर तपास यंत्रणेला विशिष्ट मुदतीत (गुन्ह्याच्या स्वरूपानुसार ६० किंवा ९० दिवस) न्यायालयात आरोपपत्र दाखल करणे बंधनकारक असते. जर या मुदतीत आरोपपत्र दाखल झाले नाही, तर आरोपीला जामीन मिळण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त होतो, यालाच वैधानिक जामीन किंवा डिफॉल्ट बेल म्हणतात. हा केवळ एक वैधानिक हक्क नसून, भारतीय संविधानाच्या कलम २१ नुसार मिळालेला गरजेपेक्षा जास्त काळ तुरुंगात ठेवण्यापासून संरक्षण देणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले की, अर्जदाराने स्पष्टपणे वैधानिक जामिनाचा उल्लेख केला नसला तरी, रासायनिक विश्लेषण अहवालाअभावी आरोपपत्र अपूर्ण असल्याचा मुद्दा त्याने अर्जात मांडला होता. न्यायालयाने पूर्वीच्या निकालांचा संदर्भ देत स्पष्ट केले की, वैयक्तिक स्वातंत्र्याच्या बाबतीत न्यायालय तांत्रिक दृष्टिकोन स्वीकारू शकत नाही. त्यामुळे, नियमित जामिनाच्या अर्जात वैधानिक जामिनाची कारणे नमूद असतील, तर तो अर्ज कायद्याने ग्राह्य धरला पाहिजे, असे न्यायालयाने नमूद केले. पोलिसांना १६ डिसेंबर २०२५ रोजीच रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाला होता, तरीही त्यांनी २१ जानेवारी २०२६ रोजी त्याशिवाय आरोपपत्र दाखल केले, यावरही न्यायालयाने ताशेरे ओढले.

या निकालावर प्रतिक्रिया देताना ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले, ''हा निकाल महाराष्ट्र आणि विशेषतः जालना येथील तपास यंत्रणा आणि न्यायव्यवस्थेसाठी एक आदर्श आहे. यातून हे शिकायला हवे की, केवळ कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करून मुदतीत आरोपपत्र दाखल करणे पुरेसे नाही, तर तपास खऱ्या अर्थाने पूर्ण झाला पाहिजे. अनेकदा अपूर्ण आरोपपत्र दाखल करून आरोपीचा वैधानिक जामिनाचा हक्क हिरावून घेतला जातो. हा निकाल अशा चुकीच्या प्रवृत्तींना चाप लावेल. या निर्णयामुळे हे सिद्ध झाले आहे की, न्यायप्रक्रिया ही नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आहे, त्यांना तांत्रिक बाबींमध्ये अडकवण्यासाठी नाही.''

अखेरीस, अशा अपूर्ण आरोपपत्राचा मुद्दा सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या खंडपीठासमोर विचाराधीन असल्याचे आणि तत्सम प्रकरणांमध्ये आरोपींना अंतरिम जामीन मंजूर करण्यात आल्याचे लक्षात घेऊन, मुंबई उच्च न्यायालयाने अर्जदाराचा जामीन अर्ज मंजूर केला. न्यायालयाने अटी व शर्तींवर, जातमुचलका सादर करून आणि खटल्यादरम्यान नियमित हजेरी लावण्याच्या अधीन राहून अर्जदाराची सुटका करण्याचे निर्देश दिले. हा निकाल भविष्यात अनेक प्रकरणांसाठी एक महत्त्वाचा संदर्भ ठरणार आहे.

# ज्ञानदीप इंग्लिश स्कूलतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**वाळूज महानगर - प्रतिनिधी**

येथील क्रांतीनगर परिसरातील दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ज्ञानदीप इंग्लिश स्कूल यांच्यामार्फत प्रमाणपत्र उपलब्ध करून पालकमंत्री संजय शिरसाट साहेब यांच्या कन्या व नगरसेविका हर्षदा ताई शिरसाट यांच्याहस्ते देऊन गौरवण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या गौरवात्मात यशाबद्दल कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.




यावेळी शाळेचे उपसंस्थाचालक प्रफुल्ल कुवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत मेहनत, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर मोठे यश मिळविता येते, असे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी भविष्यातही शाळेचे व परिसराचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.

या कार्यक्रमास ज्ञानदीप शाळेचे संस्थाचालक रोहिदास शार्दुल मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक हरिभाऊ बुरंगे पाटील ग्रामपंचायत सदस्य ,जाफर पटेल ग्रामपंचायत सदस्य, सुलेमान शेख, उद्योजक राजू शेख, प्रमुख उपस्थिती नगरसेविका हर्षदा शिरसाठ, बाबासाहेब साळुंखे पाटील उद्योजक स्वप्निल अडसुळे पंचायत समिती सदस्य सरपंच सुनील काळे, शिवाजी बोडखे वरिष्ठ, शांताराम कदम, ज्ञानदीप इंग्लिश स्कूलचे संस्थाचालक रोहिदास शार्दुल, रिटायर आर्मी आदिनाथ भूमी, उद्योजक यांची होती. मार्गदर्शक शिवाजी बोडखे व प्रफुल कुवर आणि तुळशीराम बनसोडे सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन जाधव व कु साक्षी कोल्हे यांनी केले. यावेळी कार्यक्रमास सहकार्य, दादासाहेब गडगुळे साहेब ,पांडुरंग साळुंखे उद्धव गवळी विजय साळुंखे यांचे लाभले.

# भजन आणि अन्नदान हेच खरे कल्याणाचे मार्ग - भागवतकार स्वाती दीदी

## मधुबन कॉलनीतील शिवपुराण कथेत भक्तिमय वातावरण; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना -प्रतिनिधी**

मधुबन कॉलनी परिसरातील नागरिकांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिवपुराण कथेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून, गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या धार्मिक सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला आहे. भागवतकार स्वाती दीदी यांच्या प्रभावी प्रवचनांनी उपस्थित भाविक मंत्रमुग्ध होत असून, धर्म, संस्कार आणि भक्तीचा संदेश समाजापर्यंत पोहोचत आहे.

आपल्या प्रवचनात स्वाती दीदी यांनी अन्नदान, भजन आणि देवभक्तीचे महत्त्व अधोरेखित करताना समाजातील अध्यात्मिक मूल्यांची जपणूक करण्याचे आवाहन केले. ''ज्या गावात ब्राह्मण राहत नाही, ज्या गावात अन्नदान होत नाही त्या गावाचे कधी कल्याण होत नाही.

देवाचा अभ्यास करा, देव-देव करा, त्यामुळे आपले कल्याण होईल,'' असे त्या म्हणाल्या. त्याचबरोबर त्यांनी



आधुनिक जीवनशैलीवर भाष्य करताना अध्यात्मापासून दूर जाणाऱ्या समाजाबद्दल चिंता व्यक्त केली.

''आज अनेकजण देवाकडे जात नाहीत, वर्गणी देत नाहीत, अन्नदान करत नाहीत; तरीही देव त्यांना सुख देतो. मात्र, माणूस जन्माला आल्यानंतर त्याने काय केले याची नोंद शास्त्र घेत असते. माणसाने किती भजन केले, किती भक्ती केली हेच खरे महत्त्वाचे आहे,'' असे सांगत त्यांनी उपस्थितांना भक्तीमार्ग स्वीकारण्याचा संदेश दिला.शिवपुराण कथेदरम्यान दररोज महिला, पुरुष, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहत असून, संपूर्ण परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक नागरिकांनी पुढाकार घेत या कार्यक्रमाचे आयोजन केले असून भाविकांकडूनही कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.या वेळी घुगे, मंगला शिंदे, संगीता कुरवाड, मंगला मुळे, चित्रा मुळे यांच्यासह परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जालना पोलिसांची कडक तयारी

## अवैध गोवंश वाहतूक व कत्तल रोखण्यासाठी विशेष भरारी पथक स्थापन; नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात अवैध गोवंश वाहतूक व प्रतिबंधित जनावरांच्या कत्तलीच्या घटना घडण्याची शक्यता लक्षात घेऊन जालना उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाने विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत. अशा प्रकारच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत असल्याने अवैध गोवंश वाहतूक आणि कत्तल रोखण्यासाठी शहर व परिसरात विशेष भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असून त्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या प्रेस नोटनुसार, बकरी ईदच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, धार्मिक सलोखा टिकवून ठेवणे आणि महाराष्ट्रातील लागू असलेल्या गोवंश संरक्षण कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे हा या विशेष मोहिमेचा उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार असून संशयित वाहने, जनावरांची अवैध वाहतूक आणि कत्तलीच्या हालचालींवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.

**विशेष पथकाची रचना**

या मोहिमेसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. रात्रीच्या वेळी देखरेख व समन्वयाची जबाबदारी त्यांच्याकडे राहणार आहे. दिवसा नोडल अधिकारी म्हणून पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ कार्यरत राहतील.

तसेच ग्रेड पोलीस उपनिरीक्षक संतोष खरात यांच्याकडे पथक प्रमुख म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या पथकात विविध पोलीस ठाण्यांतील कर्मचारी सहभागी करण्यात आले असून त्यामध्ये बहुरे, राहुल कटकम, नितीन झोटे, परमेश्वर धुमाळ आणि आदर्श गायकवाड यांचा समावेश आहे. हे पथक जालना शहरासह चंदनझिरा, सदर बाजार, तालुका जालना, बदनापूर आणि कदीम जालना परिसरात विशेष गस्त घालणार आहे.

**नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये**

प्रेस नोटमध्ये पोलिसांनी एक महत्त्वाचे आवाहन करताना सांगितले आहे की, काही ठिकाणी संशयित वाहने नागरिकांनी स्वतः अडविल्याची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

मात्र अशा प्रकारे कोणालाही कायदा हातात घेण्याचा अधिकार नसून त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे अवैध गोवंश वाहतूक किंवा कत्तलीबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास नागरिकांनी स्वतः कारवाई करण्याऐवजी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी.

**प्रतिबंधित जनावरांचा कुर्बानीसाठी वापर टाळावा**

बकरी ईदच्या निमित्ताने प्रतिबंधित जनावरांचा कुर्बानीसाठी वापर करू नये, असे स्पष्ट आवाहन पोलिसांनी केले आहे. संबंधित कायद्यांचे उल्लंघन झाल्यास दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

**माहिती देण्यासाठी हेल्पलाईन**

अवैध गोवंश वाहतूक किंवा कत्तलीबाबत कोणतीही गोपनीय माहिती असल्यास नागरिकांनी नियुक्त नोडल अधिकारी किंवा विशेष भरारी पथकातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नागरिकांच्या सहकार्यामुळे अशा बेकायदेशीर कृत्यांवर प्रभावी नियंत्रण मिळविणे शक्य होणार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

**कायदा-सुव्यवस्था राखण्यावर भर**

बकरी ईदच्या काळात धार्मिक भावना आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी जालना पोलिसांनी विशेष नियोजन केले आहे. संवेदनशील भागांमध्ये गस्त वाढविणे, माहिती संकलन, संशयित वाहनांची तपासणी आणि त्वरित कारवाई यावर भर दिला जाणार असून कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा तणावपूर्ण परिस्थितीला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन सतर्क असल्याचे या उपक्रमातून स्पष्ट झाले आहे.

# भोकरदन पोलिसांची शहरात धडक मोहीम

**भोकरदन -प्रतिनिधी**

भोकरदन शहरात वाढती गुन्हेगारी आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी भोकरदन पोलिस ठाणे यांनी रविवारी जोरदार धडक मोहीम राबवत रस्त्यावरच कारवाईचा बडगा उगारला.या मोहिमेदरम्यान विना नंबर प्लेट सर्रास फिरणाऱ्या तब्बल १२ दुचाकींवर कारवाई करत त्या थेट जप्त करण्यात आल्या. अचानक झालेल्या या कारवाईमुळे वाहनचालकांमध्ये एकच खळबळ उडाली.ही कारवाई पोलिस निरीक्षक किरण बिडवे यांच्या आदेशानुसार करण्यात आली.त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सागर शिंदे यांच्या पथकाने म्हणजे कर्मचारी योगेश गवळी,चरण सिंगल,



तुकाराम नागवे आदीने शहरातील विविध भागांत तपासणी मोहीम राबवली. वाहनांची तपासणी करताना नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर तत्काळ कारवाई करण्यात आली. प्रत्येक वाहनावर अधिकृत नंबर प्लेट असणे बंधनकारक असून नियम मोडणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल,असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

भोकरदन पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे नियम तोडणाऱ्यांचे धाबे दणाणले असून, सर्वसामान्य नागरिकांकडून मात्र या मोहिमेचे स्वागत करण्यात येत आहे.

वाहतूक नियमांचे पालन करणे प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.नंबर प्लेट नसलेली वाहने ही गुन्हेगारीसाठीही वापरली जाण्याची शक्यता असते.त्यामुळे अशा वाहनांवर कठोर कारवाई केली जात आहे.

नागरिकांनी वाहनांवर अधिकृत नंबर प्लेट लावून आवश्यक कागदपत्रे जवळ बाळगावीत,अन्यथा कारवाई अटळ आहे

**- सागर शिंदे**
**पोलीस उपनिरीक्षक भोकरदन पोलीस स्टेशन**

# राज्यस्तरीय ज्युनीयर टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धेकरीता निवड चाचणीचे आयोजन

**जालना -प्रतिनीधी**

टेनीस बॉल क्रिकेट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व लातुर जिल्हा टेनीस बॉल क्रिकेट असोसीएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ४ ते ६ जुन २०२६ दरम्यान उदगीर जि. लातुर येथे होणाऱ्या ज्युनीयर १९ वर्षाआतील मुले व मुलीच्यां राज्यस्तरीय ज्युनीयर टेनीस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी जालना जिल्हा टेनीस बॉल क्रिकेट असोसीएशनच्या वतीने दिनांक २७ मे २०२६ बुधवार रोजी एस.व्हि. ईग्लिंश स्कुल, कॉलेज रोड, पेन्शनपुरा जालना येथे सकाळी ९ वाजल्यापासुन निवड चाचणीचे आयोजन करण्यात आलेले आहे. निवड चाचणीमधुन जालना शहर व जालना ग्रामीण असे दोन संघ प्रत्येकी १४ मुले व १४ मुलींची निवड करण्यात येणार आहे. निवड चाचणीमध्ये सहभागी होण्याकरीता के ाणतेही नोंदणी शुल्क आकारण्यात येणार नसुन खेळाडुचे वय १९ वर्षाच्या आत व जन्मतारीख ३०/०६/२००७ च्या नंतरची असणे आवश्यक आहे. टेनिस बॉल क्रिकेट हा खेळ शालेय खेळांमध्ये समाविष्ट असुन दहावी व बारावीच्या खेळाडुंना ग्रेस मार्क साठी पात्र आहे. अधिक माहीतीसाठी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अमजत पठाण किंवा शेख चाँद पी.जे. मो.नं.९८२२४५६३६६ व जयकुमार वाहुळे, नितीन जाधव, यांच्याशी संपर्क साधावा. तरी निवड चाचणीमध्ये जास्तीत जास्त खेळाडुंनी सहभागी व्हावे असे आवाहन जालना जिल्हा टेनीस बॉल क्रिकेट असोसिएशन, जिल्हा ऑलम्पीक असोसिएशन जालना, जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने करण्यात आले

# १००% दिव्यांग व्यक्तीला हॉटेलमध्ये अमानवीय मारहाण; प्रहारचा प्रशासनाला ४८ तासांचा अल्टिमेटम

**परतूर -प्रतिनिधी**

परतूर शहरातील मनपसंद हॉटेलमध्ये एका १००% दिव्यांग (अपंग) व्यक्तीला किरकोळ कारणावरून लाथाबुक्क्यांनी आणि काठीने बेदम मारहाण केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. या अमानवीय कृत्यामुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रहार क्रांती संघटना आणि दिव्यांग बांधवांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. दोषींवर तातडीने गुन्हे दाखल न झाल्यास ४८ तासांत तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, परतूर शहरातील मनपसंद हॉटेलमध्ये कॅबिनमध्ये बसण्यासारख्या अत्यंत शुल्लक कारणावरून श्री. अली हसन मोहम्मदी (वय वर्ष १००% दिव्यांग) यांना चौघांनी मिळून क्रूरपणे मारहाण केली. एका हतबल आणि स्वतःचे रक्षण करण्यास असमर्थ असलेल्या दिव्यांग व्यक्तीला अशा प्रकारे लाथाबुक्क्यांनी आणि काठीने मारणे, ही बाब माणुसकीला आणि लोकशाहीला काळीमा फासणारी आहे. या घटनेमुळे शहरातील समाजविघातक प्रवृत्तींचे धाडस किती वाढले आहे, हेच दिसून येते. घटनेचा निषेध करण्यासाठी प्रहार क्रांती संघटनेच्या वतीने मा. उपविभागीय अधिकारी साहेब आणि मा. सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन परतूर यांना लेखी निवेदन देऊन कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. तसेच निवेदनात आरोपींवर कलमांनुसार तात्काळ गुन्हे () दाखल करण्याची मागणी केली आहे भारतीय न्याय संहिता (): कलम ११५ (स्वैच्छिक दुखापत), कलम ३५१ (गुन्हेगारी धमकी), आणि कलम ३५२ (शांतता भंग करण्याच्या हेतूने अपमान) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ ( ): कलम ९२ (दिव्यांग व्यक्तिचा छळ किंवा अपमान करणे - हा गुन्हा अजामीनपात्र आहे). तसेच १. तात्काळ व अटक: दोषींवर वरील सर्व कलमान्वये तातडीने गुन्हा दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी.२. पोलीस संरक्षण: पीडित दिव्यांग व्यक्ती श्री. अली हसन मोहम्मदी आणि त्यांच्या कुटुंबाला प्रशासनाकडून तात्काळ सुरक्षा पुरवण्यात यावी.३. जलद तपास या प्रकरणाचा तपास जलदगती न्यायालयात चालवण्यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न करावेत. ''एका १००% दिव्यांग बांधवाला अशी अमानवीय वागणूक देणे अत्यंत निंदनीय आहे. जर येत्या ४८ तासांच्या आत दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली नाही, तर प्रहार क्रांती संघटना आणि जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडले जाईल. यादरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा काही प्रश्न निर्माण झाल्यास, त्याला पूर्णतः प्रशासन जबाबदार राहील.'' प्रहार क्रांती संघटना, जालना. रवींद्र अंभोरे या घटनेमुळे परतूर शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता पोलीस प्रशासन या नराधमांवर काय कारवाई करते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# भारत जनगणना २०२७ च्या कामात अब्दुल रहीम यांची सुवर्ण कामगिरी

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

: भारत जनगणना २०२७ च्या पूर्वतयारीच्या कामात झोन क्रमांक ०३ मधील प्रगणक () शेख अब्दुल रहीम सर यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत संपूर्ण परिमंडळात बाजी मारली आहे. प्रशासनाने सोपवलेले राष्ट्रीय महत्त्वाचे काम अत्यंत वेळेत आणि १००% अचूकतेसह पूर्ण करणारे ते झोन ०३ मधील पहिले प्रगणक ठरले आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय आणि आदर्श कामगिरीची दखल घेत प्रशासनाच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

**आयुक्तांच्या हस्ते गौरव आणि कौतुकाची थाप**



शनिवार, दि. २३ मे २०२६ रोजी येथील मौलाना आझाद संशोधन केंद्र ( ) येथे आयोजित एका विशेष समारंभात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे माननीय आयुक्त अमोल येडगे () यांच्या शुभहस्ते अब्दुल रहीम सर यांचा पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी बोलताना आयुक्त मा. अमोल येडगे यांनी रहीम सरांच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केले. ''अशा कर्तव्यदक्ष आणि निष्ठावान कर्मचाऱ्यांमुळेच शासकीय मोहिमा अत्यंत प्रभावीपणे आणि यशस्वीरीत्या पूर्ण होतात,'' अशा शब्दांत त्यांनी रहीम सरांचे कौतुक करत त्यांना पाठबळ दिले. हे काम करत असताना माझ्या पर्यवेक्षक () श्रीमती फसाहत अफशा मॅम तसेच फील्ड ट्रेनर श्री. फेरोज पठाण सर आणि श्री. नदीम सर यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले. वेळोवेळी त्यांनी केलेल्या उत्तम मार्गदर्शनामुळेच हे काम अधिक सुकर झाले. मी त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो! अशी प्रतिक्रिया शेख अब्दुल रहीम, शिक्षक तथा प्रगणक झोन नंबर ३, यांनी व्यक्त केली. अब्दुल रहीम यांनी दाखवलेली तत्परता आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा ही इतर सर्व कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. झोन ३ मध्ये सर्वात पहिले अचूक आणि १००% काम पूर्ण करून त्यांनी एक नवा आदर्श घालून दिला आहे.''

श्रीमती अर्पणा थेटे (शहर प्रमुख, जनगणना विभाग)

# विवेकानंद सेवा केंद्राचे शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये घवघवीत यश

**परतूर - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे , यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विवेकानंद सेवा केंद्र परतुर संचलित विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर, विवेकानंद पब्लिक स्कूल परतुर, विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळा विवेकानंद इंग्लिश स्कूल केंधळी मंठा, अशा ४ शाळेचे एकूण ४२ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये,विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले असून केंद्राच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती दिली आहे. या परीक्षेमध्ये एकूण ४२ विद्यार्थी पात्र ठरले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे




पालक, शिक्षक व संस्थेमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सराव व शिक्षकांचे परिश्रम यामुळे हे यश मिळाले असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर एस. जी. बाहेकर साहेब, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक, संदीप दादा बाहेकर, शाळेच्या मुख्याध्यापिका, श्रीमती. शिंदे मॅडम, प्रिन्सिपल महाजन सर, दंदाले सर ,विष्णू बाहेकर सर्व शिक्षक वृंद,सर्व पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकवृंद, पालक व संस्थेचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे मत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केले. या उल्लेखनीय यशाबद्दल परिसरातून विवेकानंद सेवा केंद्राचे कौतुक करण्यात येत आहे.

# ॲमेझॉनवरून मागवले मुदतबाह्य उत्पादन, ग्राहक आयोगाने कंपन्यांना ठोठावला 30 हजारांचा दंड

**जालना - प्रतिनिधी**

ग्राहक विवाद निवारण आयोगाने एका महत्त्वपूर्ण निकालात ऑनलाइन शॉपिंग प्लॅटफॉर्म आणि विक्रेत्यांना जोरदार दणका दिला आहे. ॲमेझॉनसारख्या मोठ्या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून मुदतबाह्य उत्पादन विकल्याप्रकरणी आयोगाने विक्रेता आणि ॲमेझॉन या दोघांनाही संयुक्तपणे जबाबदार धरून ग्राहकाला ३०,७९९ रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत. हा निकाल ऑनलाइन खरेदी करणाऱ्या सर्व ग्राहकांसाठी एक मैलाचा दगड असून, कंपन्यांच्या मनमानी कारभाराला चाप लावणारा आहे, असे मत नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी व्यक्त केले. या प्रकरणाची हकीकत अशी की, उगीश कुमार के.यू. यांनी ॲमेझॉन या ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवरून मेसर्स मोझॅक वेलनेस प्रा. लि. या विक्रेत्याकडून केसांसाठी असलेले हेअर गमीज हे उत्पादन ७९९ रुपयांना खरेदी केले होते. त्यांना हे उत्पादन मार्च २०२४ मध्ये मिळाले, मात्र त्यावर उत्पादनाची अंतिम मुदत फेब्रुवारी २०२४ अशी नमूद होती. या मुदतबाह्य उत्पादनाचे सेवन केल्यामुळे त्यांना पोटदुखी, उलट्या आणि चक्कर येण्यासारखा शारीरिक त्रास सहन करावा लागला. या प्रकरणी त्यांनी थ्रिसूर ग्राहक आयोगाकडे ग्राहक तक्रार क्रमांक सीसी २४१/२४ अंतर्गत दाद मागितली.

जेव्हा पीडित ग्राहकाने ॲमेझॉनच्या ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधून परताव्याची मागणी केली, तेव्हा कंपनीने हे उत्पादन नॉन-रिटर्नेबल (परत न करता येणारे) असल्याचे सांगून आणि ५ दिवसांची परताव्याची मुदत संपल्याचे कारण देऊन त्यांची मागणी फेटाळून लावली. कंपनीच्या या बेजबाबदार वृत्तीमुळे ग्राहकाला नाहक शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागला. आयोगासमोर हे प्रकरण आल्यानंतर, विक्रेता आणि ॲमेझॉन या दोघांनीही नोटीस मिळूनही हजर न राहिल्याने त्यांच्याविरुद्ध एकतर्फी कारवाई करण्यात आली. आयोगाने आपल्या निकालात स्पष्ट केले की, मानवी वापरासाठी असलेले उत्पादन मुदतबाह्य झाल्यानंतर विकणे ही ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ नुसार अनुचित व्यापार प्रथा आणि सेवेतील त्रुटी आहे.

ॲमेझॉनसारख्या मोठ्या ई-कॉमर्स कंपनीने आपली रिटर्न पॉलिसी पुढे करून जबाबदारी झटकणे पूर्णपणे चुकीचे आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा उभारणे ही त्यांची कायदेशीर जबाबदारी आहे, ज्यात ते अपयशी ठरले. त्यामुळे विक्रेता आणि ॲमेझॉन हे दोघेही ग्राहकाला झालेल्या त्रासासाठी संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणे जबाबदार आहेत.

ॲड. महेश एस. धन्नावत यांनी सांगितले की, या निकालातून महाराष्ट्र आणि विशेषतः जालना येथील ग्राहकांनी मोठा बोध घेतला पाहिजे. ऑनलाइन खरेदी करताना ग्राहकांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी. कोणतीही वस्तू स्वीकारल्यानंतर सर्वप्रथम तिची मुदत तपासावी. जर उत्पादन सदोष किंवा मुदतबाह्य आढळल्यास तात्काळ कंपनीकडे तक्रार करावी आणि त्यांनी प्रतिसाद न दिल्यास ग्राहक आयोगाकडे दाद मागण्यास अजिबात संकोच करू नये. हा निकाल हे सिद्ध करतो की कायदा नेहमीच जागरूक ग्राहकाच्या पाठीशी उभा राहतो. आयोगाने दोन्ही कंपन्यांना उत्पादनाची रक्कम ७९९ रुपये, मानसिक त्रासापोटी २५,००० रुपये नुकसान भरपाई आणि तक्रारीचा खर्च ५,००० रुपये, असे एकूण ३०,७९९ रुपये ९% व्याजासह देण्याचे आदेश दिले आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.